# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः14.11.2025** **वारः शुक्रवार**

---

•आगामी सिंहस्थ कुंभमेळयासाठी नाशिकमध्ये दर्जेदार पायाभूत सुविधा उभारणार असल्याची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ग्वाही

•बिहार विधानसभा निवडणुकीच्या मतमोजणीला थोड्याच वेळात सुरुवात

•पुणे जिल्हा परिषदेच्या शाळांमधले 25 विद्यार्थी अमेरिकेतल्या नासाला भेट देणार

•पुण्यात नवले पुलावर झालेल्या भीषण अपघातात ८ जणांचा होरपळून मृत्यू

•आणि

•भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात कोलकात्यामध्ये आज पहिला कसोटी क्रिकेट सामना

**फडणवीस**

नाशिक आणि त्र्यंबकेश्वर परिसरात सुमारे 25 हजार कोटी रुपये खर्चाच्या दर्जेदार पायाभूत सुविधा उभारण्यात येतील आणि आगामी २५ वर्षे ती कामं टिकतील अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली आहे. नाशिक आणि त्र्यंबकेश्वरमध्ये पुढील वर्षापासून सिंहस्थ कुंभमेळा सुरू होत आहे. त्या पार्श्वभूमीवर 6 हजार कोटी रुपयांच्या कामांचं भूमिपूजन मुख्यमंत्र्यांच्या हस्ते काल झालं; त्यावेळी ते बोलत होते. ते म्हणाले . . . .

*हे तीर्थक्षेत्र अत्यंत महत्त्वाचे असल्यामुळे येथे कोणतीही कामे करताना आम्ही विशेष काळजी घेतली आहे. आमचा प्रयत्न असा आहे की या ठिकाणी करण्यात येणारी कामे पुढील पंचवीस वर्षे टिकावीत आणि नाशिककरांच्या उपयोगी पडावीत.*

*नाशिक हे एक महत्त्वाचे पर्यटनस्थान आणि तीर्थस्थान म्हणून अधिक विकसित व्हावे, यासाठी सर्व कामांचे नियोजन योग्य पद्धतीने आणि दूरगामी दृष्टीकोन ठेवून करण्यात आले आहे.*

यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मंत्री गिरीश महाजन आदी मान्यवर उपस्थित होते. नाशिकचा कुंभमेळा स्वच्छ सुंदर आणि सुरक्षित व्हावा यासाठी सर्व स्तरावर प्रयत्न सुरू आहेत, असं एकनाथ शिंदे यावेळी म्हणाले.

कार्यक्रमापूर्वी रामकुंड परिसरात सुरू असलेल्या कामांची पाहणी करून रामकाल पथ प्रकल्पाचं भूमिपूजन मुख्यमंत्र्यांनी केलं. केंद्रीय पर्यटन मंत्रालयाच्या वतीने राज्यांसाठी असलेल्या विशेष भांडवली गुंतवणूक सहाय्य योजनेंतर्गत या प्रकल्पाकरता 99 कोटी 14 लाख रुपये खर्च केला जाणार आहे. नाशिक जिल्हा परिषदेच्या नूतन इमारतीचं उद्घाटनही मुख्यमंत्र्यांच्या हस्ते करण्यात आलं.

**<u>बिहार-पूल-राजेंद्र</u>**

बिहार विधानसभा निवडणुकीची मतमोजणी आज सकाळी ८ वाजता सुरू होईल. ४६ मतमोजणी केंद्रांवर ही मतमोजणी होईल. २४३ मतदारसंघांसाठीच्या निवडणुकीचं मतदान दोन टप्प्यात झालं. या निवडणुकीत १९५१ नंतर आतापर्यंतचं सर्वाधिक ६७ पुर्णांक १३ टक्के मतदान झालं. २४३ जागांसाठी २ हजार ६१६ उमेदवार निवडणूक लढवत आहेत. सर्व मतमोजणी केंद्रांवर कडक सुरक्षा व्यवस्था ठेवण्यात आली आहे.

**<u>पंडितनेहरूजयंती</u>**

देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीनिमित्त आज देशभरात त्यांना अभिवादन करण्यात येत आहे. हा दिवस देशभरात बालदिन म्हणून साजरा केला जातो. यानिमित्त राज्यात विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

**<u>अभिवादन</u>**

माजी मुख्यमंत्री आणि सहकार महर्षी वसंतदादा पाटील यांच्या जयंतीनिमित्त काल राज्यात त्यांना अभिवादन करण्यात आलं. विधान परिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी विधान भवन परिसरातल्या वसंतदादा यांच्या पुतळ्याला अभिवादन केलं. सांगलीतल्या त्यांच्या समाधीस्थळीही वसंतदादा पाटील यांना अभिवादन करण्यात आलं.

**<u>त्रिभाषासमिती</u>**

राज्यातील शाळांमध्ये त्रिभाषा धोरण निश्चित करण्यासाठी शिक्षणतज्ज्ञ डॉ. नरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखालील समितीने काल पुण्यात संबंधित घटकांशी संवाद साधून त्यांच्या सूचना आणि प्रतिक्रिया जाणून घेतल्या. शिक्षण क्षेत्रात काम करणाऱ्या विविध व्यक्ती, संस्था प्रतिनिधी, भाषातज्ज्ञ, विचारवंत, राजकीय पक्षांचे प्रतिनिधी, लोकप्रतिनिधी आणि सामान्य नागरिकांनी यावेळी आपल्या सूचना सादर केल्या. या सूचनांचा सखोल विचार करण्यात येईल. तसंच tribhashasamiti.mahait.org या संकेतस्थळावर येणाऱ्या सूचनांचाही विचार करुन राज्य शासनाला डिसेंबर अखेर अहवाल सादर केला जाईल असं जाधव यांनी सांगितलं.

**<u>नासादौरा</u>**

पुणे जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये शिक्षण घेणारे निवडक 25 विद्यार्थी अमेरिकेतील नासा, केनेडी स्पेस सेंटरला भेट देण्यासाठी 10 दिवसांच्या अमेरिका दौऱ्यावर जाणार आहेत. हे सर्व विद्यार्थी आज मुंबईहून अमेरिकेकडे रवाना होतील, असं जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी सांगितलं. याआधी जिल्हा परिषद शाळेतील ५० विद्यार्थ्यांनी इस्रोचा दौरा पूर्ण केला आहे. 'पुणे मॉडेल स्कूल' प्रकल्पांतर्गत या शैक्षणिक दौऱ्याचं आयोजन करण्यात आलं आहे.

पुण्याच्या भोर तालुक्यात जिल्हा परिषदेच्या शाळेत शिकणाऱ्या आदिती राऊत हिची नासाच्या दौऱ्यासाठी निवड झाली आहे, याबाबत आकाशवाणीशी बोलताना अदिती म्हणाली . . .

*नासाला गेल्यावानी जे आपण रॉकेट बनवतो तर रॉकेटमध्ये काय काय*

*वापरलं जातं कसं वापरलं जातं ते बघायचं जे ग्रह आहेत ते ग्रहांवरचं मग*

*कोणकोणते बदल होतात ग्रहांवर त्यांचं परिवलन कसं होतं ते सर्व काही बघायचे*

*आणि जे महाविस्फोट होतात विस्फोट होतात ते कसे होतात ते सुद्धा बघायचे आणि दुसऱ्या*

*परीक्षेला सिलेबस हा होता की आठवी नववी दहावीच्या अंतराळ*

*संशोधनाचे जे धडे आहेत त्या धाडांवर अभ्यास करायचा होता प्रयोग करायचे होते त्या*

*प्रयोगांवर विचारणार होते आणि शिवाय ती परीक्षा कम्प्युटरवर*

*होणार होती आमच्या इकडं दुर्गम भाग असल्यामुळं कम्प्युटर कधी मी हाताळला नव्हता तरी माझ्या पालकांनी*

*शिक्षकांनी माझी तयारी करून घेतली*

**<u>चित्ताहस्तांतरण</u>**

भारताच्या प्रोजेक्ट चित्ताला बोत्सवानाने ८ चित्त्यांची देणगी दिली आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आणि बोत्सवानाच्या राष्ट्रपती डुमा बोको यांच्यात झालेल्या द्विपक्षीय चर्चेनंतर काल भारताकडे प्रतीकात्मक पद्धतीने चित्ते हस्तांतरित करण्यात आले. पुढील वर्षी दक्षिण आफ्रिकेतून ८ चित्ते भारतात स्थलांतरित केले जाणार आहेत.

**<u>बिबटे</u>**

अहिल्यानगर जिल्ह्यात बिबट्यांचे हल्ले रोखण्यासाठी अत्याधुनिक यंत्रणा उपलब्ध करुन देण्यासाठी जिल्हा नियोजन आणि विकास समितीतून ८ कोटी १३ लाख रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्यात आला असल्याची माहिती पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिली आहे. जिल्ह्यात बिबट्यांकडून होणा-या घटनांचं गांभिर्य लक्षात घेवून वन विभागाच्या जिल्हा प्रशासनाला अतिरिक्त यंत्र सामुग्री उपलब्ध करुन देण्याचं त्यांनी सुचित केलं.

दरम्यान अहिल्यानगर जिल्ह्यात बिबट्यांचा वावर वाढला असून कोपरगाव तालुक्यातील नरभक्षक बिबट्याला ठार मारण्याची परवानगी वनविभागाने दिली आहे.

**<u>श्वान</u>**

**<u>इंट्रो</u>**

पुणे महानगरपालिकेतर्फे शहरातील भटक्या श्वानांना मायक्रोचीप बसवण्याच्या उपक्रमाला सुरुवात झाली असून अशा चिप बसवणारी पुणे ही राज्यातील पहिलीच महापालिका ठरली आहे. या उपक्रमाबद्दल महापालिकेच्या मुख्य पशुवैद्यकीय अधिकारी डॉक्टर सारिका फुंडे यांनी आकाशवाणीला माहिती दिली. . .

*पुणे महानगरपालिका व त्यामध्ये समाविष्ट झालेल्या गावांमध्ये नागरिकांना भटक्या कुत्र्यांमुळे विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे. या पार्श्वभूमीवर पुणे महानगरपालिका कुत्र्यांची नसबंदी शस्त्रक्रिया तसेच त्यांचे लसीकरण (व्हॅक्सिनेशन) हे दोन्ही उपक्रम सातत्याने राबवत आहे.*

*या लसीकरण मोहिमेला अधिक प्रभावी करण्यासाठी 'मायक्रोचिपिंग' हा एक नवीन उपक्रम पायलट प्रोजेक्ट म्हणून सुरू करण्यात आला आहे. या प्रकल्पांतर्गत आम्ही प्रारंभी 600 कुत्र्यांना मायक्रोचिप बसवणार आहोत. या उपक्रमाबाबतचा प्रतिसाद (फीडबॅक) मिळाल्यानंतर पुढील काळात मायक्रोचिपिंग मोठ्या प्रमाणावर राबवण्यात येणार आहे.*

मायक्रोचिपिंगमुळे प्रत्येक कुत्र्याची ओळख व्यवस्थित पटेल, त्यांचे वार्षिक लसीकरण वेळेवर आणि सुटसुटीत पद्धतीने करता येईल. विशेष म्हणजे, महाराष्ट्रात मायक्रोचिपिंगची अंमलबजावणी करणारी पुणे महानगरपालिका ही पहिली महानगरपालिका ठरत आहे. कुत्र्यांना दिली जाणारी ही मायक्रोचिप म्हणजे एक प्रकारे त्यांचे 'डिजिटल आधारकार्ड'च असे म्हणता येईल.

**<u>अपघात</u>**

पुण्यातील नवले पुलावर काल संध्याकाळी झालेल्या भीषण अपघातात ८ जणांचा होरपळून मृत्यू झाला. पुलावर गाड्यांची एकमेकांना धडक झाल्यानंतर दोन कंटेनरनी पेट घेतला. यामध्ये एक चारचाकी वाहन अडकले आणि लागलेल्या आगीत त्यामधील नागरिकांचा मृत्यू झाला. यामध्ये अनेकजण जखमी आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी या दुर्घटनेबद्दल तीव्र दु:ख व्यक्त केलं आहे. मृतांच्या कुटुंबीयांना पाच लाख रुपयांच्या मदतीची घोषणा मुख्यमंत्र्यांनी केली आहे.

**<u>निधन</u>**

अक्कलकोट तालुक्याचे माजी आमदार आणि भाजपचे ज्येष्ठ नेते सिद्रामप्पा पाटील यांचं काल रात्री अल्पशा आजारानं सोलापुरातील खाजगी रुग्णालयात निधन झालं. ते ८८ वर्षांचे होते. त्यांच्या पार्थिवावर अक्कलकोट तालुक्यातील कुमठे या त्यांच्या मूळ गावी आज दुपारी अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

**<u>क्रिकेट</u>**

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेतील पहिला सामना आज कोलकाता इथल्या ईडन गार्डन्स स्टेडियमवर खेळला जाईल. सकाळी साडे 9 वाजता सामना सुरू होईल. भारतीय संघाचं नेतृत्व शुभमन गिलकडे असून दक्षिण आफ्रिकेचा कर्णधार तेंबा बावुमा आहे. दिल्ली बॉम्बस्फोटानंतर कोलकाता पोलिसांनी ईडन गार्डन्स स्टेडियमवर आणि आसपासच्या परिसरात सुरक्षा वाढवली आहे.

**<u>हवामान</u>**

राज्याच्या बहुतांश भागात थंडीचा जोर वाढतो आहे. विदर्भ आणि मराठवाड्यात बऱ्याच ठिकाणी किमान तापमानात लक्षणीय घट झाली आहे. नाशिक, जळगावमध्ये पारा १० अंशांवर घसरला आहे. येत्या २४ तासात संपूर्ण राज्यात हवामान कोरडं राहील, असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं. नमस्कार.